# एसव्हीकेएम, एनएमआयएमएस शिरपूर कॅम्पस अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम

(युनायटेड खान्देश वृत्तसेवा)

शिरपूर, दि.१९ - एस.व्ही. के. एम., एन.एम.आय.एम.एस. मुकेश पटेल टेक्नॉलॉजी पार्क शिरपूर कॅम्पस अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम १३ जुलै २०२४ रोजी उत्साहात उद्घाटन झाले असून २० जुलै २०२४ पर्यंत या समारंभात विविध शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. एस.व्ही. के. एम. संस्था अध्यक्ष तथा एन.एम.आय.एम.एस. अभिमत विद्यापीठ कुलपती माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, संस्था सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, संस्थेचे व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची यशस्वी घोडदौड सुरू असून संस्थेने देशभरात नावलौकिक प्राप्त केला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



व्यासपीठावर एन.एम.आय.एम. एस. शिरपूर कॅम्पसच्या प्रभारी श्रीमती रिता पटेल, शिरपूर कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनीता पाटील, एम.पी.एस.टी.एम.ई. असोसिएट डीन डॉ. व्यंकटाद्री मॅरीबॉयना, शिरपूर कॅम्पसचे मुख्य लेखापाल व प्रशासक राहुल दंदे, प्रथम वर्ष विभाग प्रमुख डॉ. गोविंद राजपूत व अनेक मान्यवर उपस्थित होते. एका आठवड्याच्या इंडक्शन प्रोग्रामचा उद्देश विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक नियम, मूल्यमापन प्रणाली व कॅम्पस लाइफ प्रोटोकॉलची ओळख करून देणे आहे. एम.पी.एस.टी.एम. ई. शिरपूरचे असोसिएट डीन डॉ. व्यंकटाद्री मॅरीबॉयना यांनी अभियांत्रिकीच्या नवीन बॅचच्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे स्वागत करून मेळाव्याला संबोधित केले.विद्यार्थ्यांनी जागतिक घडामोडींची माहिती जतन करावी. तसेच शिरपूर कॅम्पसमध्ये उपलब्ध असलेल्या विविध क्लबमध्ये त्यांचे ज्ञान आणि दृष्टीकोन विस्तृत करण्यासाठी सक्रियपणे सहभागी व्हावे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कम्फर्ट झोनमधून प्रगतीसाठी बाहेर पडावे. यशासाठी नेहमी कठोर परिश्रम घ्यावे. विद्यार्थ्यांनी सर्व प्राध्यापक कडून मार्गदर्शन घ्यावे, समाजाचा नेहमी आदर करावा. पालक हे त्यांच्या मुलामुलींचे पहिले शिक्षक असल्याने त्यांनी विद्यार्थ्यांच्या विकासात शिक्षक आणि पालकांच्या सहकार्याच्या भूमिकेवर भर द्यावा असे आवाहन त्यांनी केले.

एन.एम. आय.एम. एस. शिरपूर कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनीता पाटील यांनी प्रेरणादायी स्वागतपर मनोगत व्यक्त करुन एन.एम. आय.एम. एस. चा समृद्ध वारसा व उपलब्धींवर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांबाबत व उपक्रमांबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी त्यांचा शैक्षणिक प्रवास गांभीर्याने घ्यावा. स्टुडंट रिसोर्स बुक चे महत्त्व अधोरेखित करुन त्यातील शिस्त नियम, मार्गदर्शक तत्त्वे आणि अंतर्गत मूल्यांकन प्रणाली बाबत मार्गदर्शन केले. संस्था विद्यार्थ्यांना प्लेसमेंटसाठी तयार करण्यासाठी वचनबद्ध आहे. परंतु, चांगल्या नोकरीचे पॅकेज सुरक्षित करण्यासाठी विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे कार्यरत राहणे आवश्यक. पालकांनी देखील मुलामुलींशी नियमित संवाद साधण्याचे आवाहन करुन त्यांच्या प्रगतीसाठी पालक-शिक्षक सभांना उपस्थितीचे महत्त्व स्पष्ट केले. शिरपूर कॅम्पसमध्ये उपलब्ध व्यायामशाळा, क्रीडा क्षेत्र, एक संगीत कक्ष आणि चित्रपटगृह यासह विविध सुविधांचा वापर करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले. एन.एम.आय.एम. एस. शिरपूर कॅम्पसचे मुख्य लेखापाल व प्रशासक राहुल दंदे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

इंडक्शन कार्यक्रमाच्या पहिल्या दिवसाची सांगता पालकांशी संवादात्मक सत्राने झाली. या सत्रात पालकांचे विविध प्रश्न व समस्यांचे निराकरण करण्यात आले. पालकांना क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठी उपलब्ध असलेल्या स्पर्धांचे प्रकार, वैध कारणांमुळे वर्ग गमावलेल्या विद्यार्थ्यांच्या तरतुदी आणि प्लेसमेंटसाठी पुरविल्या जाणाऱ्या तयारीबद्दल माहिती देण्यात आली. परदेशात उच्च शिक्षणाचे नियोजन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी समर्थन, कॅम्पस प्लेसमेंटचे निकष आणि पालक-शिक्षक बैठकीचे वेळापत्रक याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले.

देशोन्नती

# अभियांत्रिकी प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्रामचे उद्घाटन

**शिरपूर** : एस.व्ही. के. एम., एन.एम.आय.एम.एस. मुकेश पटेल टेक्नॉलॉजी पार्क शिरपूर कॅम्पस अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्रामचे उत्साहात उद्घाटन झाले असून २० जुलै २०२४ पर्यंत या समारंभात विविध शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. एस.व्ही. के. एम. संस्था अध्यक्ष तथा एन.एम. आय.एम.एस. अभिमत विद्यापीठ कुलपती माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, संस्था सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, संस्थेचे व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची यशस्वी घोडदौड सुरू असून संस्थेने देशभरात नावलौकिक प्राप्त केला आहे. व्यासपीठावर एन.एम. आय.एम.एस. शिरपूर कॅम्पसच्या प्रभारी श्रीमती रिता पटेल, शिरपूर कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनीता पाटील, एम.पी .एस.टी. एम.ई. असोसिएट डीन डॉ. व्यंकटाद्री मॅरीबॉयना, शिरपूर कॅम्पसचे मुख्य लेखापाल व प्रशासक राहुल दंदे, प्रथम वर्ष विभाग प्रमुख डॉ. गोविंद राजपूत व अनेक मान्यवर उपस्थित होते.



एका आठवड्याच्या इंडक्शन प्रोग्रामचा उद्देश विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक नियम, मूल्यमापन प्रणाली व कॅम्पस लाइफ प्रोटोकॉलची ओळख करून देणे आहे. एम.पी. एस.टी.एम.ई. शिरपूरचे असोसिएट डीन डॉ. व्यंकटाद्री मॅरीबॉयना यांनी अभियांत्रिकीच्या नवीन बॅचच्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे स्वागत करून मेळाव्याला संबोधित केले. विद्यार्थ्यांनी जागतिक घडामोडींची माहिती जतन करावी. तसेच शिरपूर कॅम्पसमध्ये उपलब्ध असलेल्या विविध क्लबमध्ये त्यांचे ज्ञान आणि दृष्टीकोन विस्तृत करण्यासाठी सक्रियपणे सहभागी व्हावे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कम्फर्ट झोनमधून प्रगतीसाठी बाहेर पडावे. यशासाठी नेहमी कठोर परिश्रम घ्यावे. विद्यार्थ्यांनी सर्व प्राध्यापक कडून मार्गदर्शन घ्यावे, समाजाचा नेहमी आदर करावा.

पुण्य नगरी

# एसव्हीकेएम, एनएमआयएमएस कॅम्पसमध्ये इंडक्शन प्रोग्राम

**शिरपूर** : एस.व्ही. के. एम., एन.एम. आय.एम.एस. मुकेश पटेल टेक्नॉलॉजी पार्क शिरपूर कॅम्पस अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्रामचे नुकतेच उद्घाटन झाले. या समारंभात दि.२० जुलैपर्यंत विविध शैक्षणिक कार्यक्रम होणार आहेत. एस.व्ही. के. एम. संस्था अध्यक्ष तथा एन.एम.आय.एम.एस. अभिमत विद्यापीठ कुलपती माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, संस्था सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, संस्थेचे व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी शिरपूर कॅम्पसच्या प्रभारी रिता पटेल, डायरेक्टर डॉ. सुनीता पाटील, एम.पी.एस. टी.एम.ई. असोसिएट डीन डॉ. व्यंकटाद्री मॅरीबॉयना, मुख्य लेखापाल व प्रशासक राहुल दंदे, प्रथम वर्ष विभाग प्रमुख डॉ. गोविंद राजपूत यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. एका आठवड्याच्या इंडक्शन प्रोग्रामचा उद्देश विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक नियम, मूल्यमापन प्रणाली व कॅम्पस लाइफ



प्रोटोकॉलची ओळख करून देणे आहे. डीन डॉ. व्यंकटाद्री मॅरीबॉयना यांनी मेळाव्याला संबोधित केले. विद्यार्थ्यांनी जागतिक घडामोडींची माहिती जतन करावी. तसेच शिरपूर कॅम्पसमध्ये उपलब्ध असलेल्या विविध क्लबमध्ये त्यांचे ज्ञान आणि दृष्टीकोन विस्तृत करण्यासाठी सक्रियपणे सहभागी व्हावे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कम्फर्ट झोनमधून प्रगतीसाठी बाहेर पडावे. यशासाठी नेहमी कठोर परिश्रम घ्यावे. प्राध्यापकांकडून मार्गदर्शन घ्यावे, समाजाचा नेहमी आदर करावा. पालक हे त्यांच्या मुलामुलींचे पहिले शिक्षक असल्याने त्यांनी विद्यार्थ्यांच्या विकासात शिक्षक आणि पालकांच्या सहकार्याच्या भूमिकेवर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

डायरेक्टर डॉ. सुनीता पाटील यांनी मनोगत व्यक्त करुन एन.एम.आय.एम. एस.चा समृद्ध वारसा व उपलब्धींवर प्रकाश टाकला. स्टुडंट रिसोर्स बुकचे महत्त्व अधोरेखित करुन त्यातील शिस्त नियम, मार्गदर्शक तत्त्वे आणि अंतर्गत मूल्यांकन प्रणालीबाबत मार्गदर्शन केले. मुख्य लेखापाल व प्रशासक राहुल दंदे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

इंडक्शन कार्यक्रमाच्या पहिल्या दिवसाची सांगता पालकांशी संवादात्मक सत्राने झाली. या सत्रात पालकांचे विविध प्रश्न व समस्यांचे निराकरण करण्यात आले. पालकांना क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठी उपलब्ध असलेल्या स्पर्धांचे प्रकार, वैध कारणांमुळे वर्ग गमावलेल्या विद्यार्थ्यांच्या तरतुदी आणि प्लेसमेंटसाठी पुरविल्या जाणाऱ्या तयारीबद्दल माहिती देण्यात आली. परदेशात उच्च शिक्षणाचे नियोजन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी समर्थन, कॅम्पस प्लेसमेंटचे निकष आणि पालक-शिक्षक बैठकीचे वेळापत्रक याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

Nandurbar Edition Edition
Jul 20, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com